## - प्रास्ताविक -

शककर्ते छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्याचा सर्व बाजूने विस्तार १८ व्या शतकात पेशवे व त्यांनी निर्माण केलेले सरदार यांच्या कर्तृत्वाने संपूर्ण भारतभर हिंदवी स्वराज्याचा विस्तार झाला. औरंगजेबाच्या निधनानंतर ( १७०७ ) संभाजी पुत्र शाहू ह्यांची मोगल कैदेतून सुटका झाली व त्यांने सातार्‍याला गादी स्थापन केली. त्याच बरोबर राजाराम महाराजांची राणी ताराबाईने शाहूस विरोध केला व पन्हाळ्यास दुसरी करवीरची राजधानी स्थापन केली. अशा रितीने छत्रपती घराण्याच्या दोन शाखा झाल्या. (१) सातारा व (२) करवीर. या दोन्ही वारसांत संघर्ष चालू होता. त्याचा शेवट १७३१ ला झालेल्या वारणेच्या तहाने मिटला.

सातारा शाहू महाराजांनी मराठी राज्याच्या विस्तारासाठी स्वतः फारशी धडपड केली नसली तरी १७१३ ला त्यांचे बाळाजी विश्वनाथ या विश्वासू व मुत्सद्दी माणसास आपला पेशवा नेमले व हे वर्ष म्हणजे मराठी इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. कारण त्यानंतर मराठी सत्तेच्या अखेर पर्यन्त (१८१८) पेशवे पद हे बाळाजी विश्वनाथाच्या घराण्यातच अनुवंशिक परंपरेने चालत राहिले. बाळाजी विश्वनाथानंतर १७२० ला त्यांचा मुलगा पहिला बाजीराव ( १७२० ते १७४० ), नानासाहेब ( १७४० ते १७६१ ), माधवराव ( १७६१ ते १७७२ ) इ. कर्तृत्ववान, शूर, धाडसी पेशवे होऊन गेले व त्यांच्या प्रयत्नाने मराठी राज्याचा विस्तार झाला.

१७४९ ला सातारा छत्रपती शाहू महाराजांचे निधन झाले व साताऱ्याचे महत्व कमी होऊन पुण्याचे राजकिय महत्व वाढले. पेशव्यांनी उत्तरेत शिंदे, होळकर, गायकवाड, पवार इ. सरदार निर्माण केले तर दक्षिणेत पटवर्धन सरदार प्रामुख्याने पेशव्यांचे सरदार म्हणून उदयास आले. कोल्हापूरचे छत्रपती व पेशव्यांचे संबंध दुरावलेले असल्याने कोल्हापूरच्या छत्रपतींना शह देण्यासाठी पेशव्यांनी पटवर्धनांना मिरज, कुरुंदवाड, सांगली, तासगांव , इ. भागात जहागीरी दिल्या.

ह्या शाखा पैकी तासगांवची शाखा ही महत्वाची समजली जाते करण ह्याच घराण्यात थोर सेनानी, मुत्सद्दी, पराक्रमी, राजकरण निपुण असा परशुरामभाऊ होऊन गेला म्हणून तासगांव पटवर्धनांचा इतिहास देण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे. मला जी उपलब्ध माहिती मिळाली तिच्या आधारे मी तासगांवचे पटवर्धन, परशुराम भाऊंचे कार्य व कर्तृत्व त्यांनी केलेल्या संस्थानातील धार्मिक कृत्ये इ. चा अभ्यास केलेला आहे.

ह्या प्रबंधाच्या कामात मला अनेक व्यक्तींचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. त्यांचे आभार मानने हे मी कर्तव्य समजते. सुरुवातीस ह्या संशोधन कार्यात मला वेळोवेळी माझे मार्गदर्शक डॉ. बी.डी. खाणे यांचे वेळोवेळी सहकार्य, मार्गदर्शन मिळाले म्हणूनच मी हे काम वेळेत पूर्ण करु शकले. म्हणून मी त्यांचे अतिशय ऋणी आहे.

तासगांव राजवाड्यातील राजेंद्र पटवर्धन व दिवाणजी यांचे पण सहकार्य मिळाले म्हणून मी त्यांचे आभार मानते. ह्या सर्व कामात मला प्रथम पासूनच माझे आई व वडील श्री. दिनकर संकपाळ व भाऊ संजय, तसेच सुरेश पाखरे आणि सन्माननीय पती प्रा. अनिल पाटील, ह्या सर्वांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले म्हणून मी या सर्वांची आभारी

आहे. तसेच शेवटी यशश्री टायपिंग सेंटरने माझे टंकलेखनाचे काम वेळेत पूर्ण करुन दिले म्हणून मी त्यांचे आभारी आहे.

ह्या प्रबंधात व्यक्त केलेली मते ही माझी असून त्यात कदाचीत कांही चुका असल्यास मी वैयक्तीक जबाबदार आहे.

कोल्हापूर.
दिनांक: ३० नोव्हेंबर, १९८९.

सुलोचना संकपाळ.

. . . . .